# जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री/तारतंत्री व कोपा या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, महावितरण नागपूर ग्रामिण मंडल अंतर्गत सन 2024-25 करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबद्ध करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता **दिनांक 22.06.2024 (00.00 तासापासुन) ते दिनांक 29.06.2024 (24.00 तासापर्यंत)** विभाग निहाय आस्थापना नोंदणी क्रमांकावर online अर्ज करावे नागपूर ग्रामीण मंडल, नागपूर अंतर्गत असणाऱ्या विभागाचे आस्थापना नोंदणी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | आस्थापना नोंदणी क्रमांक | कोपा | वीजतंत्री | तारतंत्री |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर ग्रामिण मंडल, नागपूर | E10162702301 | 17 | – | – |
| 2 | काटोल विभाग | E05202700171 | 06 | 32 | 20 |
| 3 | मौदा विभाग | E12172700132 | 06 | 21 | 14 |
| 4 | सावनेर विभाग | E01182700026 | 03 | 41 | 11 |
| 5 | उमरेड विभाग | E12172700189 | 02 | 15 | 15 |

1. **शैक्षणिक अर्हता :** (1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (2) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री / तारतंत्री / कोपा या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.
2. **शैक्षणिक दस्ताऐवज :** (1) एस.एस.सी. व आय.टी.आय. वीजतंत्री/तारतंत्री चार सेमिस्टर व कोपा या व्यवसायातील दोन सेमिस्टरची उत्तीर्ण गुणपत्रिकेची मूळप्रत. (2) आधारकार्ड व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगीक आवश्यक कागदपत्रांची मूळप्रत उमेदवारांने स्वतः च्या प्रोफाईलवर स्कॅन करून अपलोड करावे.
3. **विद्यावेतन :** प्रचलित नियमाप्रमाणे लागू राहिल.
4. **वयोमर्यादा :** दिनांक 31.05.2024 पर्यंत 18 ते 32 वर्ष व मागासवर्गीयांसाठी 05 वर्ष शिथील राहील.

वरील शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवाराची नोंदणी ग्राह्य धरली जाईल. **(5)** नमुद पद संख्या कमी जास्त करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविला जाणार नाही. **(6)** भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल. **(7)** वरील कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. **(8)** शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आ.टी.आय. गुणांच्या टक्केवारीनुसार (अनुक्रमे 40 व 60 टक्के) अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल. **(9)** शासन निर्णयानुसार अनुसुचित जातीकरीता 1:10 व अनुसुचित जमातीकरिता 1:11 प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरिता शासन निर्णयानुसार पदे राखीव राहतील. **(10)** तसेच उमेदवारांनी संकेतस्थळावर Online Registration ची नोंदणी केल्याची प्रत **(www.aprenticeshipindia.org)** व शैक्षणिक अर्हता धारण गुणपत्रिका/प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रतीसह आपला अर्ज **दिनांक 24.06.2024 ते 02.07.2024 पर्यंत** संबंधीत कार्यालयास कामकाजाचे दिवशी सादर करावे व जे उमेदवार आपले संपूर्ण दस्ताऐवजसह संबंधित कार्यालयास अर्ज सादर करणार नाही त्या उदमेवारांची प्रशिक्षणा करिता निवड करण्याबाबत विचार करण्यात येणार नाही. **(11)** तसेच विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत रहीवासी असलेलेच उमेदवारांचे अर्ज संबंधीत विभागाकरिता ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अधीक्षक अभियंता,**

**नागपूर ग्रामीण मंडल, महावितरण, नागपूर**

**NZPR : 74/2024**